**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अल्जिरियाचा तीन दिवसांचा दौरा आटोपून आज दुसऱ्या टप्प्यात मॉरिटानियाला रवाना

- शांघाय सहकार्य संघटनेची तेवीसावी बैठक आज पाकिस्तानात इस्लामाबाद इथं सुरु

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीचं रिपोर्टकार्ड प्रसिद्ध

- जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांचा शपथविधी

**आणि**

- स्टॉकहोम खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीत विजय सुंदर प्रशांत आणि जीवन नेदुनचेझियान या भारतीय जोडीचा उपांत्य पूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू अल्जिरियाचा तीन दिवसांचा दौरा आटोपून आज दुसऱ्या टप्प्यात मॉरिटानियाला रवाना झाल्या. राष्ट्रपती मुर्मू यांनी अल्जेरियाचे उच्चपदस्थ आणि शिष्टमंडळांसोबत विविध द्विपक्षीय बैठका घेतल्या आणि भारत-अल्जेरिया संबंधांना बळकटी मिळण्याच्या दृष्टिकोनातून विचारविनिमय केला. मॉरिटानियाच्या एका दिवसाच्या दौऱ्यात त्या मॉरिटानियाचे प्रधानमंत्री मोहम्मद ओल्ड गजौआनी आणि इतर नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठकांमध्ये सहाभागी होतील. त्यानंतर राष्ट्रपती मुर्मू मॉरिटानियातल्या भारतीय समुदायाशीही संवाद साधणार आहेत. राष्ट्रपतींचा अल्जेरिया दौरा ऐतिहासिक ठरला असून या दौऱ्यामुळे दोन्ही

देशांमधील राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक संबंधांना चालना मिळेल. तसंच ब्रिक्समध्ये अल्जेरियाच्या सदस्यत्वाच्या मुद्द्याला भारत पाठिंबा देईल, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव अरुणकुमार चॅटर्जी यांनी सांगितलं.

<><><><><>

एनएसजी अर्थात राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दलाच्या स्थापना दिना निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. देशाच्या संरक्षणाप्रति एनएसजी जवानांचं समर्पण, धैर्य आणि निर्धार यामुळे देश त्यांना सलाम करत आहे, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. एनएसजी ज्या निष्ठेने देशाच्या संरक्षणासाठी झटते ते प्रशंसनीय आहे. असंही त्यांनी नमूद केलं आहे.

<><><><><>

शांघाय सहकार्य संघटनेची तेवीसावी बैठक आज पाकिस्तानात इस्लामाबाद इथं सुरु झाली. दर वर्षी भरणाऱ्या या बैठकीत संघटनेच्या व्यापार आणि आर्थिक धोरणावर मुख्यतः भर दिला जातो. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर या बैठकीत सहभागी झाले आहेत. गेल्या नऊ वर्षात परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांनी शेजारी राष्ट्राला भेट देण्याची ही पहिलीच वेळ आहे. जयशंकर यांनी आज भारतीय वकिलातीच्या परिसरात अर्जुन वृक्षाचे रोप लावलं.

<><><><><>

केंद्रीय अर्थ आणि कॉर्पोरेट व्यवहारमंत्री निर्मला सीतारामन उद्यापासून मेक्सिको आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. येत्या १७ ते २० ऑक्टोबर दरम्यान मेक्सिको दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात सीतारामन ‘टेक लीडर्स’ गोलमेज परिषदेचं अध्यक्षपद भूषवतील. या परिषदेच्या निमित्तानं माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या

भारतीय दिग्गजांसह या जागतिक स्तरावरचे अनेक तज्ज्ञ आणि उद्योजक एकत्र येत आहेत. सीतारामन मेक्सिकोचे अर्थमंत्री रोगलिओ रामिरेझ दे लाओ यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेणार असून संसदीय सहकार्य बळकट करण्यासाठी आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी त्या मेक्सिकन संसदेच्या अनेक सदस्यांशीही चर्चा करणार आहेत. त्यानंतर मेक्सिको सिटीमध्ये आयोजित भारत-मेक्सिको व्यापार आणि गुंतवणूक शिखर परिषदेत सीतारामन यांचं मुख्य भाषण होणार आहे. या परिषदेत उभय देशातील महत्त्वाच्या उद्योग प्रमुखांचा सहभाग असेल. भारतीय जनसमुदायानं आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्येही त्या सहभागी होणार आहे. त्यानंतर २० ते २६ तारखेदरम्यान त्यांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात त्या अमेरिकेला जाणार आहेत.

**<><><><><>**

जगभरात होणाऱ्या डिजिटल व्यवहारांपैकी ४६ टक्के व्यवहार भारतात होतात, असं केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सांगितलं. नवी दिल्ली इथल्या भारत मंडपम इथं आज झालेल्या आंतरराष्ट्रीय सिक्स जी परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. या वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात यूपीआयद्वारे २७५ अब्ज डॉलरचे दीड अब्ज व्यवहार झाले, असं शिंदे यांनी सांगितलं. प्रत्येक नागरिकाची सायबर सुरक्षा सुनिश्चित करण्याची गरज व्यक्त करत, सीक्स जी तंत्रज्ञानात भारत जगाचं नेतृत्व करेल, असंही शिंदे म्हणाले.

**<><><><><>**

खेळणी तयार करण्यासाठी सर्व प्रकारचे घटक उपलब्ध करून देणारी परिसंस्था भारताने तयार केली असून भारत हा आता खेळणी निर्यात करणारा देश बनल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सांगितलं. नवी दिल्ली इथं पहिल्या इंडियन फाऊंडेशन क्वालिटी मॅनेजमेंट परिषदेच्या समारोपाच्या कार्यक्रमात ‘विकसित भारत २०४७ साठी राष्ट्रीय गुणवत्ता

चळवळीचं शासन’ या विषयावर गोयल बोलत होते. देशात एक मजबूत गुणवत्तापूर्ण परिसंस्था तयार करण्यासाठी सरकार झिरो डिफेक्ट, झिरो इफेक्ट या सूत्रानुसार काम करत आहे, असं गोयल यावेळी म्हणाले. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगासाठी गुणवत्तापूर्ण परिसंस्था निर्माण करण्यासाठी उद्योगांनी सरकारसोबत भागीदारी करावी असं आवाहन गोयल यांनी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्रात काल विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर सत्ताधारी महायुतीने आज सरकारच्या आजपर्यंतच्या कामांचा आढावा घेणारं प्रगती पुस्तक प्रकाशित केलं.

महाविकास आघाडीने अडीच वर्षांत अनेक प्रकल्पांमध्ये अडथळे आणले. पण, महायुतीचं सरकार आल्यानंतर विकासाला गती मिळाली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या उपस्थितीत आज महायुतीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, खासदार सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. महायुती सरकारच्या कामाचा आढावा घेणारं काम हीच आमची ओळख हे रिपोर्ट कार्ड या पत्रकार परिषदेत प्रकाशित करण्यात आलं.

महाविकास आघाडीचं स्थगितीचं सरकार २०२२ मध्ये जाऊन त्यानंतर महायुतीचं गती आणि प्रगतीचं सरकार आलं. महाराष्ट्रात परिवर्तन करणाऱ्या योजना महायुती सरकारनं केल्या. शेती, शिक्षण, नदीजोड तसंच सिंचन प्रकल्प, विविध प्रशासकीय घटकांसाठी दिलासा अशा योजना महायुती सरकारने आणल्या, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

विरोधक सातत्याने फेक नॅरेटिव्ह पसरवत होते. मात्र, एकाच टप्प्यात निवडणुका जाहीर झाल्या आहेत. २०२२ ते २०२४ या काळात आपल्याबद्दल

विरोधकांनी आरोप केले. पण, महायुती सरकारनं फार विचारपूर्वक योजना जाहीर केल्या. सर्व घटकांना या योजनांच्या माध्यमातून लाभ देण्याचा प्रयत्न सरकारने केला. त्याचा लेखाजोखा रिपोर्ट कार्डात आहे असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा 'रणांगण विधानसभेचे' हा कार्यक्रम उद्या गुरुवार, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**<><><><>**

जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून  नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी आज शपथ घेतली. श्रीनगरच्या शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये  झालेल्या कार्यक्रमात नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. अब्दुल्ला यांच्याबरोबर आणखी ५ मंत्र्यांचाही शपथविधी यावेळी झाला. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे तसंच इंडीया आघाडीतले इतर नेते या समारंभाला उपस्थित होते. संविधानाचं कलम ३७० रद्द झाल्यानंतर प्रथमच झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स पक्षानं बहुमत मिळवलं आहे.

**<><><><>**

स्टॉकहोम खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा विजय सुंदर प्रशांत आणि  जीवन नेदुनचेझियान यांनी पुरुष दुहेरीच्या उपांत्य पूर्व फेरी गाठली. या जोडीची लढत पेट्र नौजा आणि पॅट्रिक रिकल यांच्याशी होणार आहे.

दरम्यान, पुरुष एकेरीच्या पहिली फेरीत भारताचा सुमित नागल याची गाठ फ्रान्सच्या क्वेंटिन हेलीज याच्याशी होईल. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार चार वाजून ५० मिनिटांनी सुरू होईल.

**<><><><>**

पिकांचे अवशिष्ट जाळल्याने होणाऱ्या प्रदूषणाबाबत न्यायालयाच्या निर्देशांचं पालन न केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने पंजाब आणि हरयाणा सरकारला जाब विचारला आहे. हरयाणाच्या सरकारी अधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्याचा आदेश न्यायमूर्ती अभय ओक यांच्या पीठाने हवामान गुणवत्ता व्यवस्थापन आयोगाला दिला आहे तसंच या कारवाईसाठी आठवड्याची मुदत दिली आहे. न्यायालयाचे आदेशाचं पालन करण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई का करण्यात आली नाही याचं स्पष्टीकरण देण्यासाठी हरयाणा तसंच पंजाबच्या सचिवांना पुढच्या बुधवारी न्यायालयात हजर रहाण्याचं समन्स बजावलं आहे.

**<><><><>**

मुंबईच्या ओशिवरा भागात आज एका इमारतीतल्या घराला लागलेल्या आगीत तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका वृद्ध दांपत्याचा आणि त्यांच्या मदतनीसाचा समावेश आहे. ओशिवरा इथल्या रिया पॅलेस या इमारतीत दहाव्या मजल्यावर सकाळी साडे आठच्या सुमाराला आग लागली. या आगीच्या धुरामुळे चंद्रप्रकाश सोनी, ममता सोनी आणि त्यांचा मदतनीस पेलू बेटा यांचा गुदमरून मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली असून या आगीचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

**<><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाकडून गांजा पकडला. हा गांजा

साधारण ३ कोटी ४६ लाख रुपये किमतीचा आहे.  हा गांजा खाद्यपदार्थांच्या पाकिटात भरुन प्रवाशाने ती पाकीटं आपल्या जवळच्या ट्रॉलीत ठेवली होती. दुबईहून आलेल्या एका प्रवाशाने  कर चुकवून आणलेलं सोनंही सीमाशुल्क विभागानं जप्त केलं.  हे २४ कॅरेट सोनं सळ्यांच्या स्वरुपात एका शिवणयंत्रात लपवून आणलं होतं.

**<><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना बेंगळुरू येथे खेळला जाणार आहे. आज (१६ ऑक्टोबर) सामन्याचा पहिला दिवस आहे. हा सामना बेंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे. मात्र, सध्या बंगळुरू इथं पाऊस असल्यामुळे सामना उशिरानं सुरू होईल. अद्याप नाणेफेक झालेलं नाही.

**<><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाचा भारतीय उपखंडावरुन परतीचा प्रवास काल पूर्ण झाला, त्याचवेळी ईशान्य मोसमी पाऊस सक्रीय झाला आहे.  बंगालच्या उपसागरात चेन्नईपासून सुमारे ४९० किलोमीटर अंतरावर तयार झालेला कमी दाबाचा पट्टा आज **पुद्दुचेरी आणि नेल्लोर दरम्यान उत्तर तामिळनाडू आणि दक्षिण आंध्र प्रदेश** किनारपट्टी ओलांडण्याची शक्यता आहे. त्यामुळं आज दिवसभरात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची आणि येत्या दोन दिवसात मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**